**<u>प्रेसनोट</u>** दि. 04/06/2026

**ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे कडून महावितरणचे हडपसर उपविभाग-2 मधील अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारलेप्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे घटक** |
|---|---|
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | फुरसुंगी पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 अन्वये. |
| **तक्रारदार** | पुरुष वय 43 वर्षे |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | रामचंद्र नारायण लोंढे, वय 42 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद अतिरिक्त कार्यकारी अभियंता, **(वर्ग-1)**, महावितरण नेमणुकीचे ठिकाण हडपसर उपविभाग 2, पुणे. राठी - फ्लॅट नंबर 103, ए विंग,प्लॉट नंबर 22, कृष्णा नगर ,चिंचवड, पुणे 19. |
| **सुरवातीची लाच मागणी** | रू.12,000/- (बारा हजार रूपये) |
| **पडताळणी दरम्यान लाच मागणी** | रू. 12,000/- लाचेची मागणी करून रू. 4,500/- स्विकारल्याचे मान्य करून उर्वरीत रू.7,500/- (सात हजार पाचशे रूपये) ची लाच मागणी. |
| **पडताळणी दिनांक** | दि. 02/06/2026 रोजी |
| **स्वीकारलेली लाच रक्कम** | रू.7,500/- (सात हजार पाचशे रूपये) |
| **सापळा दिनांक** | दि. 04/06/2026 रोजी 13.06 वा. |
| **ठिकाण** | महावितरण, उपविभाग- दोन, हडपसर पुणे येथील कार्यालय, ता.हवेली जि.पुणे |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. अविनाश घरबुडे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9860667770) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. सुहास हट्टेकर, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9881873330) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार हे इलेक्ट्रिकल सब कॉन्ट्रॅक्टर असून ते महावितरणाची कामे करतात. महावितरणचे उप विभाग-2, हडपसर, पुणे चे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री लोंढे हे तक्रारदार यांनी केलेल्या नवीन 12 वीजमीटर जोडणीच्या कामाचे एक हजार रुपये प्रतिमीटर प्रमाणे तक्रारदाराकडे बारा मीटरचे 12,000/- रुपयांची मागणी करत आहेत तसेच तक्रारदार यांना मिळालेल्या अन्य एका नवीन इमारतीच्या वीज कनेक्शनच्या कामाकरिता 50,000/- हजार रुपये ची मागणी श्री. लोंढे हे करीत असल्याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी दिनांक 02/06/2026 रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे दिली होती.

वरील प्रमाणे तक्रार प्राप्त झाल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी तक्रारीच्या अनुषंगाने दि.2/6/2026 रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान यातील आरोपी लोकसेवक अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री लोंढे यांनी तक्रारदाराकडून बसविण्यात आलेल्या नवीन 12 वीजमीटर जोडणीचे प्रतिमीटर 1,000/- रुपये प्रमाणे बारा मीटरचे 12,000/- लाचेची मागणी करून त्यातील 4,500/- रुपये यापूर्वी घेतल्याचे कबूल केले व उर्वरित 7,500/- रुपयाची तक्रारदाराकडे लाच मागितल्याचे निष्पन्न झाले.

वरील प्रमाणे झालेल्या लाच मागणीच्या अनुषंगाने दिनांक 4/6/2026 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक श्री रामचंद्र नारायण लोंढे यांनी तक्रारदाराकडून त्याच्या केलेल्या कामाच्या बदल्यात मोबदला म्हणून 7,500 रुपयाची लाच स्वीकारली असता 13:06 वा. हडपसर, उपविभाग-दोन, पुणे येथील कार्यालय, ता.हवेली जि.पुणे या ठिकाणी रंगेहात पकडण्यात आले.

वरील आरोपीस ताब्यात घेतले असून त्यांच्याविरुद्ध फुरसुंगी पोलीस ठाणे, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा अधिनियम 1988 अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.

1) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक -020-26122134, 26132802, 26050423, 9403781064

2) व्हॉट्स-ॲप क्रमांक - 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)

3) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in

4) वेबसाइट - www.acbmaharashtra.gov.in

5) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

सहायक पो आयुक्त/पोलीस उप-अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो सत्यमेव जयते

4/6/26

दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.